**पिंपरी चिंचवड महानगरपालिका फ प्रभाग कार्यालय**

**कार्यपत्रिका क्रमांक २**

**सभावृत्तांत**

**(दि.८.५.२०१५ ची तहकूब सभा)**

दिनांक:- १२ / ६ / २०१५ वेळ. दुपारी ११.३० वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची फ प्रभाग समितीची दि. ८/५/२०१५ ची मासिक तहकुब सभा दिनांक १२ / ६ /२०१५ रोजी दुपारी ११.३० वाजता फ क्षेत्रीय कार्यालयातील “राजर्षी शाहु महाराज सभागृहात” आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य/सदस्या उपस्थित होते.

१. मा. बो-हाडे शुभांगी संजय सभापती
२. मा. पौर्णीमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा.भालेकर शांताराम कोंडीबा उर्फ एस.के.बापू
४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५. मा.स्वाती प्रमोद साने
६. मा.थोरात वनिता एकनाथ
७. मा. सायकर अजय शंकरराव
८. मा. जाधव साधना रामदास
९. मा. जाधव राहुल गुलाब
१०. मा. बहिरवाडे नारायण सदाशिव
११. मा.पवार संगीता शाम
१२. मा.तानाजी विठ्ठल खाडे
१३. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
१४. मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन

याशिवाय श्री.दिलीप गावडे क्षेत्रीय अधिकारी, श्री.विजय वाघमारे प्रशासन अधिकारी, श्री.सतिश इंगळे कार्यकारी अभि.(स्था), श्री.संदेश चव्हाण कार्यकारी अभि.(वि), श्री.पी.जी.जाधव (लेखाधिकारी), श्री.राणे आर.व्ही.,उप.अभि. (स्था), श्री.प्रदीप पुजारी, उप.अभि. (स्था.झोनिपू), श्री.कांबळे श.म., उप.अभि. (स्था), श्री.डी.बी.सपताळे, उप.अभि. (वि), आबासाहेब ढवळे, उप.अभि. (ज.नि.), श्री.नरोटे एस.एल. उप अभि.(स्था),श्री.दाते टी.एच (सहा.आरो. अधिकारी), श्री.मोरे चंद्रकांत चिंधा हॉर्टी. सुपरवायझर, श्री.ई.एच.बंडवल हॉर्टी.सुपरवायझर, श्री.टी.डी.गायकवाड हॉर्टी.सुपरवायझर, श्री.अतुल जोशी, क. अभियंता (पापु) श्री.विजयकुमार शिंदे क अभियंता (पापु), श्री.रोकडे बी.जी.प्र.क.अभि. (वि), श्रीम.प्रभावती गाडेकर मुख्य लिपिक, श्री.नंदकिशोर वाघ मुख्य लिपीक इ. अधिकारी सभेस हजर होते.

मा.सभापती यांनी सर्वांचे स्वागत करुन सभा सुरु करावी असे सांगितले. दि. ८/४/२०१५ रोजीचे सभेचा सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्र.१३), व दि. १०/४/२०१५ रोजीचे सभापती निवडणुक (कार्यपत्रिका क्र.१) चा सभावृत्तांत कायम करणेत आला.

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक:- मा. स्वाती साने अनुमोदक:-मा.साधना जाधव

महाराष्ट्राचे माजी मंत्री गोविंदराव आदिक, श्री.शुंभम काटे यांचे दु:खद निधन झालेले असल्याने त्यांना दोन मिनिटे श्रध्दांजली वाहणेत यावी.

मा.सभापती यांनी श्रध्दांजली वाहणेसाठी दोन मिनिटे स्तब्ध रहावे, असे सांगितले.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.

सन्मा.सदस्य/सदस्या यांनी खालील मुद्दयांवर चर्चा केली.

**मा.तानाजी खाडे**:- माझे प्रभागातील आरोग्य कर्मचा-यांचे बदल्यांबाबत श्री.दाते सहा.आरोग्य अधिकारी यांना सांगितले आहे. वारंवार सांगून बदल्या करीत नाहीत. मी दाते यांचीच बदली करावी असा ठराव मांडतो.

**मा.संगीता पवार:-** माझे वॉर्डातील एक विधवा महिलेस ठेकेदाराकडे कामावर घ्या असे वारंवार सांगून रुजु करुन कामावर घेतलेले नाही.माझ्याच दारात कचरा पडलेला असतो. गटारे तुंबलेली असतात, काम व्यवस्थित होत नाहीत.

**श्री.दाते सहा.आरोग्य अधिकारी**:- सन्मा.यांचेशी चर्चा झालेप्रमाणे गावडे साहेब यांचेशी बोलून कर्मचा-यांच्या बदल्या केल्या आहेत.

**मा.अजय सायकर**:- माझ्या वॉर्डात पण आरोग्याची समस्या मोठी आहे. आजच नागरिकांचा मोर्चा येणार होता. पण मी त्यांना आज सभेत बोलतो असे सांगून थांबवल.

**श्री.दाते सहा.आरोग्य अधिकारी:-** वेळापत्रकाप्रमाणे कचरा गोळा करणे, फॉगींग,धुरीकरण, औषधफवारणी चालु आहेत. कचरा उचलणा-या गाडयाचा प्रॉब्लेम आहे. गाडया आहेत पण ड्रायव्हर नाहीत.

**मा.क्षेत्रीय अधिकारी**:- रोज वॉर्डनिहाय पाहणी करुन योग्य ती कार्यवाही करु

**मा.शांताराम भालेकर**:- दाते साहेब कारणे सांगून टाळाटाळ करु नका, प्रॅक्टीकल व्हा.पिंपरी चिंचवड शहर स्मार्ट सिटी म्हणून आरोग्य विभागाचे काम सुधारणे गरजेचे आहे. पाणीपुरवठयाच्या समस्या देखील गंभीर आहे. पहाटे ४ वाजता उठून पाणी भरावे लागते. मागच्या मिटींगला देखील पाणीपुरवठा अधिकारी उपस्थित नव्हते. हे योग्य नाही.

**मा.साधना जाधव**:- उन्हाळयात पाणीपुरवठ्याचे नियोजन करुन परिस्थिती सुधारा

**मा.क्षेत्रीय अधिकारी**:- श्री. शिंदे सन्मा.सदस्यांच्या तक्रारींचा गांभीर्याने विचार करुन समस्या दूर करा.

**मा.सभापती:-** प्रत्येक विभागाचे अधिकारी सभेला उपस्थित असलेच पाहिजे. कोणतीही कारणे नकोत.

**मा.मंदाकिनी ठाकरे**:- आरोग्याचे कर्मचारी कमी आहेत. मुकादम नाही. यामुळे कामे होत नाहीत.

**श्री.दाते सहा.आरोग्य अधिकारी:-** कर्मचा-यांची मागणी वेळोवेळी केलेली आहे. कर्मचारी प्रशासन विभागाकडून मिळत नाहीत.

**मा.राहुल जाधव**:- कच-याच्या बकेट वाटपाचे काय झाले त्याचा तपशिल घ्यावा. हे काम चुकीचे झाले का ?

**मा.क्षेत्रीय अधिकारी**:- वाटपाचा तपशील आहे.

**मा.राहुल जाधव**- घरोघरी बकेट दिल्या नाहीत.

**मा.सुरेश म्हेत्रे**:- बकेट वाटपांचे काम किती झाले ?

**मा.राहुल जाधव**- रस्ता सफाईची गाडी माझे प्रभागात येत नाही. स्पाईन रोडवर गाडी आलीच पाहिजे. कच-यांच्या गाडया १५-१५ दिवसात प्रभागात येत नाहीत. कच-यांचे ढिग पडलेत. गाडया आल्या नाहीत. लोक कचरा टाकतात. पावसाळयाची सुरुवात होत असलेने विषय गांभीर्याने घ्या. माझ्याबरोबर इतर प्रभागातले काम पण चांगले होवू दया.

**मा.सुरेश म्हेत्रे**:-माझे प्रभागात गटारे साफ करणारे कर्मचारी किती आहेत. उघडया गटारांसाठी जे कर्मचारी आहेत. त्यांचेकडून कामे होत नाही.

**मा.पौर्णीमा सोनवणे**:- आरोग्याच्या तक्रारी असताना दाते यांचे त्याकडे लक्ष नाही. नेहमी उडवाउडवीची उत्तरे देतात. अशा अधिका-यांची आम्हाला गरज नाही.

**मा.सुरेश म्हेत्रे**::-मा.पौर्णीमा सोनवणे यांनी सांगितलेप्रमाणे श्री.दाते यांचे कामात लक्ष नाही. त्यामुळे त्यांना प्राधिकरणासारख्या भागात नेमणुक दया. आम्हाला त्यांची गरज नाही.

**मा.सभापती**:- दातेसाहेब आज सगळयाच सदस्यांनी कामांच्या तक्रारी केल्या आहेत. त्यांची दक्षता घ्या. पुढच्या मिटींगला तक्रार येता कामा नये.

**मा.क्षेत्रीय अधिकारी**:- मा.सभापती यांनी सुचना केल्याप्रमाणे नागरिकांसाठी याबाबत वेळीच दक्षता घ्या. पाणीपुरवठयाच्या संदर्भातल्या सूचना आहेत.श्री. शिंदे याकडे दुर्लक्ष न करता ही कामे करुन घ्या.

**मा.सभापती**:- श्री.ढवळे साहेब से.क्र.२२ च्या इमारतीमध्ये चेंबर सफाईच्या मशिनची गाडी आणून गाळ काढून घ्यावा.

यानंतर मा.सभापती यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

---

सही/-
मा.शुभांगी संजय बो-हाडे
सभापती
फ क्षेत्रीय कार्यालय

जा.क्र.फक्षेका/सभा/कावि/८६/२०१५
दि. १२/०६/२०१५

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
फ क्षेत्रीय कार्यालय

प्रत:- सर्व संबंधित शाखा प्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, फ प्रभाग कार्यालय**

**कार्यपत्रिका क्रमांक ३**

**सभावृत्तांत**

दिनांक:- १२ / ६ / २०१५ वेळ. दुपारी १२.०० वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची फ प्रभाग समितीची मासिक सभा दिनांक १२ / ६ /२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता फ क्षेत्रीय कार्यालयातील "राजर्षी शाहु महाराज सभागृहात" आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य/सदस्या उपस्थित होते.

१. मा. बो-हाडे शुभांगी संजय सभापती

२. मा. पौर्णीमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

३. मा. भालेकर शांताराम कोंडीबा उर्फ एस.के.बापू

४. मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ

५. मा. स्वाती प्रमोद साने

६. मा. थोरात वनिता एकनाथ

७. मा. सायकर अजय शंकरराव

८. मा. जाधव साधना रामदास

९. मा. जाधव राहुल गुलाब

१०. मा. बहिरवाडे नारायण सदाशिव

११. मा. पवार संगीता शाम

१२. मा. तानाजी विठ्ठल खाडे

१३. मा. (चिखले) मराठे अश्विनी अजित

१४. मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन

याशिवाय श्री.दिलीप गावडे क्षेत्रीय अधिकारी, श्री.विजय वाघमारे प्रशासन अधिकारी, श्री.सतिश इंगळे कार्यकारी अभि.(स्था), श्री.संदेश चव्हाण कार्यकारी अभि.(वि), श्री.पी.जी.जाधव (लेखाधिकारी), श्री.राणे आर.व्ही.,उप.अभि. (स्था), श्री.प्रदीप पुजारी, उप.अभि. (स्था.झोनिपू), श्री.कांबळे श.म., उप.अभि. (स्था), श्री.डी.बी.सपताळे, उप.अभि. (वि), आबासाहेब ढवळे, उप.अभि. (ज.नि.), श्री.नरोटे एस.एल. उप अभि.(स्था),श्री.दाते टी.एच (सहा.आरो. अधिकारी), श्री.मोरे चंद्रकांत चिंधा हॉर्टी. सुपरवायझर, श्री.ई.एच.बंडवल हॉर्टी.सुपरवायझर, श्री.टी.डी.गायकवाड हॉर्टी.सुपरवायझर, श्री.अतुल जोशी, क. अभियंता (पापु) श्री.विजयकुमार शिंदे क अभियंता (पापु), श्री.रोकडे बी.जी.प्र.क.अभि. (वि), श्रीम.प्रभावती गाडेकर मुख्य लिपिक, श्री.नंदकिशोर वाघ मुख्य लिपीक इ. अधिकारी सभेस हजर होते.

मा.सभापती यांचे परवानगीने खालीलप्रमाणे ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.१ प्रभाग क्र.११ से.नं. २२ मध्ये आर.सी.सी. कमानी बांधून त्यांना नांवे देणेबाबत- मा.संगीता पवार व मा.अश्विनी चिखले यांचा प्रस्ताव

विषय क्र.२ श्री. दाते सहा.आरोग्य अधिकारी यांची बदली करणेबाबत- मा.तानाजी खाडे व मा.संगीता पवार यांचा प्रस्ताव

विषय क्र.३ निगडी गावठाण प्रभाग क्र.१३ मध्ये महाराणा प्रताप उद्यान असून त्या ठिकाणी महाराणा प्रताप यांचा अर्धपुतळयावर FRP मेघडंबरी उभारणेबाबत. मा.अश्विनी चिखले व मा.संगीता पवार यांचा प्रस्ताव

विषय क्र.४ प्रभाग क्र.४ येथील प्राधिकरणाकडून हस्तातंरीत झालेल्या तसेच उदयानाचे आरक्षण असलेल्या मोकळी जागा क्र.२६ शिवतेजनगर से.नं.१८ येथील नियोजीत उदयानास “श्री.स्वामी समर्थ उदयान” असे नामकरण करणेबाबत. मा.अजय सायकर व मा.नारायण बहिरवाडे

ठराव क्र.३ विषय क्र.१

दि. १२/६/२०१५ विभाग:-

सुचक:- मा.संगीता पवार अनुमोदक:- मा.अश्विनी चिखले

संदर्भ:- मा.संगीता पवार व मा.अश्विनी चिखले यांचा दि. १२/६/२०१५ चा प्रस्ताव

विषय:- प्रभाग क्र.११ से.नं.२२ मध्ये आर.सी.सी. कमानी बांधणेबाबत....

राजनगर, इंदिरानगर,संजयनगर, मिलिंदनगर इन्नागरी वसाहती येतात. तरी खालीलप्रमाणे कमानींना नांवे देणेबाबत.

| अ.क्र. | कमानींना देण्यात येणारी नांवे | नागरी वसाहती |
|---|---|---|
| १) | मरीआई माता मंदीर | मिलिंदनगर |
| २) | जेतवन बुध्द विहार | मिलिंदनगर |
| ३) | सावित्रीबाई फुले सांस्कृतिक भवन | संजयनगर |
| ४) | बुध्दवासी अनिल आठवले मार्ग | इंदिरानगर |
| ५) | आण्णाभाऊ साठे समाजमंदीर | राजनगर |
| ६) | पावन मारुती मंदिर मार्ग | इंदिरानगर |
| ७) | आण्णाभाऊ साठे मार्ग | चिकन चौक |
| ८) | आई तुळजाभवानी मार्ग | बौध्दनगर |

वरील ठिकाणी आर.सी.सी. कमानी उभारुन या कमानींना उपरोक्त प्रमाणेची नांवे देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्र.४ विषय क्र.२

दि. १२/६/२०१५ विभाग:-

सुचक:- मा.तानाजी खाडे अनुमोदक:- मा.संगीता पवार

संदर्भ:- मा.तानाजी खाडे व संगीता पवार यांचा दि. १२/६/२०१५ चा प्रस्ताव

विषय:- बदली करणेबाबत

फ प्रभाग कार्यालयातील सहाय्यक आरोग्य अधिकारी श्री.दाते हे काम करीत नाही. स्वच्छतेबाबत देखील तक्रारी आहेत. नगरसेवकांचा अपमान केल्यासारखे वागतात. त्यामुळे त्यांची फ प्रभागातून अन्य प्रभागामध्ये बदली करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र.५ विषय क्र.३

दि. १२/६/२०१५ विभाग:-

सुचक:- मा.अश्विनी चिखले अनुमोदक:- मा.संगीता पवार

संदर्भ:- मा.अश्विनी चिखले व मा.संगीता पवार यांचा दि. १२/६/२०१५ चा प्रस्ताव

विषय:- महाराणा प्रताप उद्यान परिसर सुशोभित करणेचा ठराव मंजूर करणेबाबत

निगडी गावठाण प्रभाग क्र.१३ मध्ये महाराणा प्रताप उद्यान असुन त्या ठिकाणी “महाराणा प्रताप” यांचा अर्धपुतळा बसविणेत आलेला आहे.

सदरचे महाराणा प्रताप पुतळयासाठी FRP मेघडंबरी उभारणेचे कामास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्र.६ विषय क्र.४

दि. १२/६/२०१५ विभाग:-

सुचक:- मा.अजय सायकर अनुमोदक:- मा.नारायण बहिरवाडे

संदर्भ:- मा.अजय सायकर व मा. नारायण बहिरवाडे यांचा दि. १२/६/२०१५ चा प्रस्ताव

विषय:- प्रभाग क्र.४ येथील प्राधिकरणाकडून हस्तातंरीत झालेल्या तसेच उदयानाचे आरक्षण असलेल्या मोकळी जागा क्र.२६ शिवतेजनगर से.नं.१८ येथील नियोजीत उदयानास “श्री.स्वामी समर्थ उदयान” असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

यानंतर मा.सभापती यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
मा.शुभांगी संजय बो-हाडे
सभापती
फ क्षेत्रीय कार्यालय

जा.क्र.फक्षेका/सभा/कावि/८६/२०१५
दि. १२/०६/२०१५

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
फ क्षेत्रीय कार्यालय

प्रत:- सर्व संबंधित शाखा प्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना